महाराष्ट्र गट-क सेवा, संयुक्त (मुख्य) परीक्षा - 2024
पेपर क्र.-१ दि. 29 सप्टेंबर 2024

**2024**

**C21**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
|---|
| 125637 |

**संच क्र. A**

# प्रश्नपुस्तिका – I
## मराठी व इंग्रजी

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 200**

**वेळ : 1 (एक) तास**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ | | | | | | | | ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

**SEAL**

## ताकीद

**ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपुस्तिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपत्रिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम – २०२४" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षापेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षापर्यंत वाढवित येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. पीडा हा शब्द ________ आहे.

(1) तत्सम (2) तद्भव (3) देशी (4) साधित

2. 'गरुड' या शब्दाला कोणता शब्द समानार्थी नाही ?

(1) खगेंद्र (2) द्विजराज (3) वैनतेय (4) विहंगम

3. खालीलपैकी कोणता शब्द देशी शब्द नाही ?

(1) डोके (2) धोंडा (3) घमेलं (4) बाजरी

4. राजू इतरांच्या आधी जेवला कारण त्याला भूक लागली, हे वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

(1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य
(3) मिश्र वाक्य (4) होकारार्थी वाक्य

5. 'मी तुम्हाला जे काही सांगतो आहे ते अगोदर तुम्ही नीट समजावून घ्या' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) केवल वाक्य (2) मिश्र वाक्य
(3) संयुक्त वाक्य (4) संकेतार्थ वाक्य

6. योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| a. | आहुती देणे | i. | आतुरता वाढणे |
| b. | ओढ लागणे | ii. | मुळीच नसणे |
| c. | औषधाला नसणे | iii. | मोठा त्याग करणे |
| d. | अग्निदिव्य करणे | iv. | सर्वस्व अर्पण करणे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | i | ii | iii |
| (2) | ii | iii | iv | i |
| (3) | iv | i | iii | ii |
| (4) | iii | ii | iv | i |

**7.** पुढील वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे ?

'वाखाणणी करणे'

a. स्तुती करणे

b. दुर्लक्ष करणे

c. आनंदी होणे

d. दुःखी होणे

(1) a, c बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त a बरोबर बाकी सर्व चूक

(3) सर्व चूक

(4) सर्व बरोबर

---

**8.** पुढील वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे ?

'अंगाची लाही होणे'

(1) रागाने बेफाम होणे

(2) जबाबदारी टाळणे

(3) सर्व बाजूंनी संकटे येणे

(4) शेवट करणे

---

**9.** 'पोबारा करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ कोणता ते सांगा ?

(1) भीती वाटणे (2) वैधव्य येणे (3) पळून जाणे (4) नाश करणे

---

**10.** वाक्प्रचार आणि त्याचे अर्थ यांच्या जोड्या लावा.

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| a. सुपारी देणे | i. मरण येणे |
| b. दिवा विझणे | ii. फसवणे |
| c. तुरी देणे | iii. साठा करणे |
| d. बेगमी करणे | iv. आमंत्रण देणे |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | i | ii | iii |
| (2) | i | ii | iv | iii |
| (3) | iii | ii | i | iv |
| (4) | iii | iv | ii | i |

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**11.** 'समाजातील दुष्टप्रवृत्तीचे लोक' या शब्दसमूहासाठी एक शब्द

(1) अवर्णनिय (2) समाजकंटक (3) स्वामीनिष्ठ (4) मूकबधीर

---

**12.** 'वेदांश कोणत्याही प्रश्नाचे तत्काळ उत्तर देतो.' यातील अधोरेखित शब्दसमूहाऐवजी एक शब्द

(1) अष्टपैलू (2) बुद्धिप्रामाण्यवादी (3) संशोधक (4) हजरजबाबी

---

**13.** पुढीलपैकी सामासिक शब्द कोणता ?

(1) वनभोजन (2) झोपाळू

(3) कलमदान (4) सायकल

---

**14.** पुढीलपैकी सिद्ध शब्द कोणता ?

(1) यश (2) यशस्वी (3) अपयशी (4) यशश्री

---

**15.** 'अभिभाषण' हा ________ शब्द आहे.

(1) प्रत्ययसाधित (2) सामासिक

(3) उपसर्गसाधित (4) अभ्यस्त

---

**16.** 'अरेरे, आणि, कडे' ही अनुक्रमे कोणत्या अव्ययांची उदाहरणे आहेत ?

(1) उभयान्वयी, शब्दयोगी, केवलप्रयोगी

(2) केवलप्रयोगी, उभयान्वयी, शब्दयोगी

(3) क्रियाविशेषण, उभयान्वयी, शब्दयोगी

(4) शब्दयोगी, उभयान्वयी, केवलप्रयोगी

---

**17.** 'संबोधन' दर्शविताना कोणते विरामचिन्ह वापरतात ?

(1) अर्धविराम (2) स्वल्पविराम

(3) अपूर्णविराम (4) उद्गारचिन्ह

---

18. बरोबर असलेला पर्याय लिहा.

a. ट्, ठ्, प्, फ् ही मृदू व्यंजने आहेत.

b. ग्, घ्, ब्, भ् ही कठोर व्यंजने आहेत.

c. ण्, ङ्, म्, न् ही अनुनासिके आहेत.

(1) केवळ a बरोबर, b, c चूक
(2) केवळ b बरोबर, a, c चूक
(3) केवळ c बरोबर, a, b चूक
(4) a, b, c बरोबर

19. 'आजारानंतर मला आता खेळवते' या वाक्यातील 'खेळवते' या क्रियापदास काय म्हणतात ?

(1) शक्य क्रियापद
(2) सिद्ध क्रियापद
(3) प्रयोजक क्रियापद
(4) अनियमित क्रियापद

20. '<u>विस्तीर्ण</u>' आकाशात तेजस्वी तारे चमकतात. अधोरेखित शब्दांतील विशेषणाचा प्रकार ओळखा.

(1) संख्याविशेषण
(2) गुणविशेषण
(3) सार्वनामिक विशेषण
(4) पूर्णांकवाचक विशेषण

21. खालीलपैकी शक्य क्रियापद असणारे वाक्य कोणते ?

(1) मी अभ्यास करीत नाही.
(2) मी आत जातो.
(3) मला तिखट खाववते.
(4) राम चहा पितो.

22. 'वाचन हा व्यक्तीचा सर्वात उत्तम मित्र आहे' हे कोणत्या प्रकारचे वाक्य आहे ?

(1) होकारार्थी वाक्य
(2) संकेतार्थी वाक्य
(3) आज्ञार्थी वाक्य
(4) विध्यर्थी वाक्य

23. पुढीलपैकी कोणते वाक्य हे संयुक्त वाक्य आहे ?

(1) नोकरी मिळावी म्हणून तो शहरात जात आहे.
(2) संदीप क्रिकेट खेळतो.
(3) मरावे परी कीर्तीरूपे उरावे.
(4) पाऊस पडला असता तर पीक चांगले आले असते.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

24. दिलेल्या वाक्याचे होकारार्थी विधानात बिनचूक परिवर्तन असलेला पर्याय निवडा.
'पोटभर जेवल्यास कुणाला तृप्ती वाटत नाही ?'
(1) पोटभर जेवल्यास कोण तृप्त होतो ?
(2) पोटभर जेवल्यास प्रत्येक जणाला तृप्ती वाटते.
(3) पोटभर जेवल्याने कुणीही तृप्त होत नसतो.
(4) पोटभर जेऊनही कोणीतरी अतृप्त असतो.

25. दिलेल्या वाक्यातील विशेषण बदलून केलेल्या वाक्य परिवर्तनाचा योग्य पर्याय निवडा.
'तरुण माणसांना हिंमत असते.'
(1) तरुणांना हिंमत असते.
(2) तरुण माणसे हिंमती असतात.
(3) वृद्ध माणसांना हिंमत असते.
(4) तरुण माणसे हिंमतवान नसतात.

26. 'अंबुज' चा समानार्थी शब्द
(1) मृदूल (2) अंबर (3) सरोज (4) अंडज

27. 'प्रसन्न' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द
(1) हर्ष (2) खिन्न (3) चिडका (4) निराश

28. 'सोक्षमोक्ष' हा शब्द शब्दसिद्धीच्या कोणत्या प्रकारात मोडतो ?
(1) अभ्यस्त
(2) अंशाभ्यस्त
(3) पूर्णाभ्यस्त
(4) अनुकरणवाचक

29. खालीलपैकी शुद्धलेखनदृष्ट्या अचूक शब्द कोणता ?
(1) अथिती
(2) आथिती
(3) अतिथि
(4) अतिथी

30. 'वसुंधरा' चा समानार्थी नसणारा शब्द
(1) सविता (2) वसुधा (3) धरती (4) धरा

**31.** म्हणी व त्याचा अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. छत्तीसचा आकडा | i. अत्यंत प्रिय व्यक्ती |
| b. दुष्काळात तेरावा महिना | ii. विरुद्ध मत असणे |
| c. नाकाचा बाल | iii. डोईजड होणे |
| d. नाकापेक्षा मोती जड | iv. संकटात अधिक भर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | i | ii | iv |
| (2) | ii | iv | i | iii |
| (3) | iv | ii | iii | i |
| (4) | ii | i | iii | iv |

---

**32.** खालील म्हणीचा अचूक अर्थ सांगा.

'भित्या पाठी ब्रम्हराक्षस' ______________

(1) ज्यांच्या अंगात सामर्थ्य तो इतरावर अंमल गाजवतो.

(2) भित्र्या माणसावरच संकटे कोसळतात.

(3) जो वेळेला हजर असतो त्याचा फायदा होतो.

(4) पैशाने सर्व कामे साध्य होतात.

---

**33.** 'पी हळद अन् हो गोरी' या म्हणीचा अर्थ कोणता ते सांगा ?

(1) उतावळेपणा दाखविणे

(2) मुर्ख सल्ला देणारा

(3) संकटात अधिक भर

(4) योग्यतेप्रमाणे वागावे

---

**34.** म्हणी आणि त्याचे अर्थ यांच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| a. पाचा मुखी परमेश्वर | i. आई बापाप्रमाणेच मुले |
| b. दाम करी काम | ii. कुठेही गेले तरी मनुष्यस्वभाव सारखाच |
| c. खाण तशी माती | iii. पुष्कळ लोक जे बोलतात ते खरे |
| d. पळसाला पाने तीनच | iv. पैशाने सर्व कामे साध्य होतात |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | ii | i |
| (2) | i | ii | iii | iv |
| (3) | iii | iv | i | ii |
| (4) | ii | i | iv | iii |

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

35. 'उपकारामुळे मिळालेल्या सवलतीचा दुरुपयोग करू नये' या आशयासाठी योग्य म्हण

(1) मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये
(2) भटाला दिली ओसरी भट हातपाय पसरी
(3) वाकड्या बोटाशिवाय तूप निघत नाही
(4) हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागू नये

36. खालीलपैकी कोणते वर्ण तालव्य आणि दन्ततालव्य उच्चारले जातात ?

(1) प, फ, ब, भ
(2) ट, ठ, ड, ढ
(3) च, छ, ज, झ
(4) य, र, ल, व

37. खालीलपैकी संयुक्त स्वर कोणते ?

(1) अ, इ, उ, ऋ
(2) आ, ई, ऊ, ऋ
(3) अ, ऊ, लृ, औ
(4) ए, ऐ, ओ, औ

38. 'श्रीमंत माणसांना गर्व असतो.' या वाक्यातील विशेषणाचे नामात रूपांतर करा.

(1) माणसे श्रीमंत असली की गर्व असतो.
(2) श्रीमंतांना गर्व असतो.
(3) कधीही गर्व करणारी श्रीमंत माणसे.
(4) यापैकी नाही

39. पुढील विधाने वाचा.

a. कर्तरी प्रयोगात क्रियापद हे कर्त्यांच्या तंत्राप्रमाणे चालते.
b. कर्मणी प्रयोगात कर्ता हा प्रथमान्त कधीच नसतो.
c. भावे प्रयोगात कर्ता किंवा कर्म हे दोन्ही गौण असतात.

(1) फक्त a बरोबर
(2) a, b, c बरोबर
(3) फक्त b चूक a व c बरोबर
(4) a, b, c चूक

40. 'षष्ठी व सप्तमी' एकवचनी विभक्तीचे अनुक्रमे प्रत्यय कोणते ?

(1) चा, ची, चे - ने, ए, शी
(2) त, ई, आ - स, ला, ते
(3) त, ई, आ - चा, ची, चे
(4) चा, ची, चे - त, ई, आ

**प्रश्न क्र. 41 ते 45 : पुढील उतारा वाचून प्रश्नांची योग्य ती उत्तरे लिहा.**

जगातील प्रत्येक माणसाने प्रकाशाचा संबंध आनंदाशी जोडला आहे. अन् अर्थातच काळोखाचा संबंध दु:ख, संकटाशी; दिवाळीचा सण तर साक्षात प्रकाशोत्सव ! लक्ष्मीचे पूजन, तिची आराधना अन् तिचे कायमचे वास्तव्य राहावे यासाठी घरे, दुकाने, व्यवसायाची जागा यांची साफसफाई करण्यात मनुष्य गुंतून जातो. जिथे उजेड, प्रकाश, चमचमाट, लखलखाट, स्वच्छता अन् रोषणाई तिथे तिथे लक्ष्मीचे चैतन्यमयी कायमस्वरूपी वास्तव्य. जिथे अंधार, काळोख, कुबट वातावरण, बकालपणा, अस्वच्छता तिथे दारिद्र्य ! लक्ष्मी तिथे जाण्यास अनुत्सुक ! हे अंधारलेले बकालपण, दारिद्र्यामुळे येते की बकालपणामुळे दारिद्र्य येते ? अन् केवळ दारिद्र्यामुळेच काळोख आहे हे तरी कितपत सत्य आहे ? केवळ रोषणाई अन् झगझगाट जिथे आहे तिथेदेखील दुसऱ्या अनेक प्रकारचे दारिद्र्य असतेच की, जसे वैचारिक दारिद्र्य, मानसिक दारिद्र्य, आपल्याजवळ केवळ लक्ष्मी टिकून राहावी अन् त्यातून कणभरही इतरांना द्यावेसे वाटू नये असे वैचारिक दारिद्र्य असणारी धनकनकसंपन्न माणसे खूप आहेत. घरात सर्व प्रकारची सुबत्ता असूनही कोऱ्या मनाची माणसे नात्यांमध्ये तणाव उत्पन्न करत जगतात. त्यांच्या घरी कितीही नेत्रदीपक रोषणाई असली तरी घरातील काही माणसांची मने उपेक्षेने, वंचनेने काळोखलेलीच असतात.

खरा दीपावलीचा अर्थ नीट कळलेलाच नसतो अशा लोकांना. आपल्यासारख्या प्रापंचिकांना, पंचपक्वान्ने, दिवाळीचा फराळ, वस्त्र-आभूषण खरेदी, शुभेच्छांची देवाणघेवाण यापलीकडे या एकमेवाद्वितीय प्रकाशोत्सवी सणाचा अर्थ कळून घेण्याची काय गरज, असेही कुणाला वाटून जाईल. पण '*दुरितांचे तिमीर जावो*' अशी नम्र मागणी विठ्ठलाकडे करणारे ज्ञानेश्वरच '*गृहस्थाश्रमु न सांगता । कर्म रेखा नोलांडिता ।*' विठ्ठलभक्तीचा मार्ग समाजाला सांगून गेले आहेत. प्रत्येकच संताच्या आयुष्यात विठ्ठलाची आराधना करून जेव्हा आत्मसाक्षात्काराचा सूर्योदय झाला, तेव्हा तेव्हा जीवन्मुक्तावस्थेच्या त्या अनुपम क्षणी त्यांच्या मनातला तो आनंद त्यांनी वर्णन केला; तेव्हा तेव्हा प्रकाशाचाच उल्लेख आलेला आहे. रात्रंदिवस विठ्ठल दर्शनासाठी झुरणाऱ्या नामदेवांना जेव्हा विठ्ठलाने उराशी धरले तेव्हा त्यांची तहानभूक हरवली.

नामदेवांच्या अभंगरचनांमधून असा वारंवार, आत्मानंदाचा संबंध दिवाळीच्या सणाशी जोडल्याचे उल्लेख सापडतात. भवतापाने दग्ध झालेले तुकाराम जेव्हा विठ्ठलाचा धावा करतात, प्रसंगी त्याची याचना करतात तर कधी कधी त्याला रोखठोक सवाल करतात. कधी चक्क शिव्या देतात परंतु एका अलौकिक क्षणी जेव्हा त्यांना दिव्य प्रचिती येते तेव्हा '*अंतरीची ज्योती । प्रकाशली दीप्ती*' असे वर्णन ते करतात. विठ्ठलचरणी स्थिरावलेल्या मनातला तो अंतिम मुक्तीचा क्षण जेव्हा अनुभवाला येतो, त्याक्षणी त्या जीवन्मुक्त आनंदाचा संबंध प्रकाशाशीच जोडला जातो. '*पाजळला दीपु । फिटला अंधकारू वो*' हीच खरी दिवाळी. हाच खरा प्रकाशोत्सव ! प्रत्येक संतमन हेच सांगून जाते. आजच्या तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीच्या काळात, दिवाळीच्या सणातून आपण नेमके काय शिकायचे ? '*म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृते येणे । सणु भोगिजे सणे । विश्वाचेनि ।।*' ज्ञानेश्वर सांगून गेले आहेत की, अनुभवामृतात जो रमेल त्याला सणवाराची कृत्रिम सुखेही तुच्छ वाटतील. आपण तर सामान्य प्रापंचिक माणसे; अमृतानुभव येणे खूप दुष्प्राप्य आहे.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

41. कोऱ्या मनाची माणसे नात्यात तणाव निर्माण करतात, जेव्हा
अ. त्यांच्या घरात सुबत्ता असते; परंतु मानसिक दारिद्र्यही असते.
ब. लक्ष्मीचे चैतन्यमयी कायमस्वरूपी वास्तव्य त्यांच्या घरात नसते.
क. त्यांच्या घरात नेत्रदीपक रोषणाई असते.
ड. त्यांचा मनात लखलखाट असतो.
(1) अ आणि ब बरोबर
(2) ब आणि क बरोबर
(3) फक्त अ बरोबर
(4) फक्त ड बरोबर

---

42. मराठी संतांनी दिवाळीचा संबंध कशाशी जोडलेला आहे ?
अ. तहान-भूकेशी
ब. आत्मानंदाशी
क. दिव्यांशी
ड. लौकिक आनंदाशी
(1) फक्त ब बरोबर
(2) अ आणि क बरोबर
(3) क आणि ड बरोबर
(4) ब आणि क बरोबर

---

43. जीवन्मुक्त आनंदाचा संबंध दिवाळीशी का जोडला जातो ?
अ. कारण मनातला अंधार फिटला जातो.
ब. कारण दिवाळीला अनेक दीप उजळले जातात.
क. कारण अंतरीची ज्योत प्रकाशमान होते.
ड. कारण दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव असतो.
(1) अ चूक बाकी सर्व बरोबर
(2) क चूक बाकी सर्व बरोबर
(3) अ आणि क बरोबर बाकी सर्व चूक
(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

---

44. प्रस्तुत उताऱ्याचे सार काय ?
अ. उजेडाची व्याख्या
ब. दिवाळीचा सण
क. दिव्यांचे प्रकार
ड. 'उजेडा'ची ओळख
(1) फक्त ड बरोबर
(2) फक्त क बरोबर
(3) फक्त ब बरोबर
(4) फक्त अ बरोबर

---

**45.** मानसिक दारिद्र्य असेल तर कोणत्या गोष्टीला अर्थ उरत नाही ?

(1) बकालपण (2) श्रीमंती

(3) दानशूरपणा (4) आत्मसाक्षात्कार

**46.** 'साटेलोटे' या शब्दाचा प्रकार पुढीलपैकी कोणता ?

(1) सामासिक (2) नादानुकरणवाचक

(3) अंशाभ्यस्त (4) पूर्णाभ्यस्त

**47.** खालील वाक्याचा प्रकार सांगा.

'नद्यांना प्रचंड पूर आला.'

(1) नकारार्थी वाक्य (2) प्रश्नार्थक वाक्य

(3) विधानार्थी वाक्य (4) आज्ञार्थक वाक्य

**48.** पुढीलपैकी विधानार्थी वाक्य कोणते ?

(1) तू आलास तर मी येईन. (2) पावसात खेळू नकोस.

(3) वादळामुळे फार विनाश झाला आहे. (4) अरेरे ! फार वाईट झालं.

**49.** पुढीलपैकी मिश्र वाक्य ओळखा.

(1) राजांनी गनिमी कावा करण्याचे ठरवले; तेव्हाच खानाचा पराभव निश्चित झाला.

(2) तो या वेळी घरी असेल किंवा पोहायला गेलेला असेल.

(3) आकाशात ढग जमले आणि पाहता पाहता पाऊस कोसळू लागला.

(4) मी बाजारात जाईन व मला पाहिजे ते सर्व साहित्य घेऊन येईन.

**50.** पुढीलपैकी प्रत्ययसाधित शब्द कोणता ?

(1) वाढपी (2) सायकल (3) ताप (4) दरवर्षी

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**51.** Which suffix to the word "develop –" will make the sentence meaningful ?

"The develop ________ of the new technology has seen significant improvement".

a. – er
b. – ed
c. – ment
d. – ing

(1) c and d both (2) c only
(3) a and b both (4) d only

---

**52.** Which of the following words are opposite in meaning to 'reluctant' ?

a. averse
b. hesitant
c. enthusiastic
d. keen

(1) a and c both (2) b and c both
(3) c and d both (4) a and d both

---

**53.** Complete the sentence by choosing the correct option given below the sentence.

"Our school ____________ rivals easily.

a. beat
b. bit
c. beet
d. bet

(1) b and d both (2) c and d both
(3) a only (4) b only

---

**54.** Identify the correctly spelt word underlined, in the following sentences.

a. Her constant criticism began to alienate her friends and family.
b. Her constant criticism began to allienate her friends and family.
c. Her constant criticism began to allienated her friends and family.
d. Her constant criticism began to aliennate her friends and family.

(1) a only (2) b only (3) c only (4) d only

---

**55.** Select the closest synonym of "adulate" in the sentence.

"Despite his peers' disdain, he continued to adulate influential figures, seeking their favour".

(1) Flatter (2) Deride (3) Neglect (4) Oppose

---

56. 'I wished my brother had been here.'

The Past Perfect Tense in the sentence above has been used to indicate ______

a. unreal situation
b. hypothetical situation
c. an action which had already occurred in the past
d. completion of action

(1) Only b (2) Only d (3) Only c (4) Only a

---

57. i. I seldom go to the movies.
ii. He always comes late to class.
iii. I never sit in the last row.

The words underlined in the sentences (i), (ii) and (iii) above exemplify ______.

a. adverbs of time
b. adverbs of duration
c. adverbs of frequency
d. adverbs of degree

(1) Only c (2) Only d (3) Only b (4) Only a

---

58. i. This is my book.
ii. This book is mine.

The words underlined in the sentences (i) and (ii) above are ______ respectively.

a. Possessive pronoun, possessive adjective
b. Possessive pronoun, possessive pronoun
c. Possessive adjective, possessive pronoun
d. Personal pronoun, possessive pronoun

(1) Only d (2) Only c (3) Only a (4) Only b

---

59. Spot the part in which there is error in the following sentence :

'The cost of/all the necessaries/have/gone up.'
a b c d

(1) Only d (2) Only a (3) Only b (4) Only c

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**60.** Choose the correct meaning for the idiom : "To cool one's heels"
(1) To close the chapter
(2) To walk on the heels
(3) To remain in comfortable position
(4) Wait or be kept waiting

---

**61.** The decision has <u>baffled</u> the cast and crew of the film.
Select the correct opposite word for the underlined.
(1) Confused (2) Stunned (3) Cleared (4) Enlightened

---

**62.** Choose the correct Wh-question :
There was a mobile on the table, so I picked it up and said, "_______ mobile is this ?"
(1) Whose (2) Whom (3) Who (4) When

---

**63.** Identify the cohesive device used in the following sentences :
"He has been in office for only a few months. He has, however, achieved more than any of his predecessors."
a. Contrast
b. Concession
c. Addition
d. Transition
(1) Both b and c (2) Only b (3) Both a and d (4) Only d

---

**64.** Identify the indirect narration of the following sentence :
"Where do you want to go now ?" he said to me.
a. He asked I want to go at that time.
b. He asked me where I wanted to go then.
c. He asked whether I wanted to go then.
d. He questioned me about where I wanted to go then.
(1) Both a and b (2) Both b and d (3) Both c and d (4) All of the above

---

**65.** Change the following into the superlative degree :
"Prevention is better than cure"
a. Prevention is always better than cure.
b. Prevention is as good as cure.
c. Prevention is the best cure.
d. Prevention is better than any cure.
(1) Both a and c (2) Both b and d (3) Only c (4) Only d

---

**66.** What is the meaning of the phrase, 'to grease the palm' ?

a. to massage
b. to clap
c. to bribe
d. to stretch

(1) Only d (2) Only b (3) Only c (4) Only a

**67.** Which phrase best defines "climbdown" ?

(1) A retreat from a previous position
(2) An act of admitting that you were wrong
(3) A steady approach to a goal
(4) A refusal to compromise

**68.** Identify the correct sentence or sentences using the phrase "the salt of the earth".

a. The arrogant businessman was the salt of the earth, and looked down on everyone else.
b. The gentle teacher, who took extra time to help struggling students, was the salt of the earth.
c. The fire fighter, who risked his life to save others, was the salt of the earth.
d. The con artist was the salt of the earth, and everyone trusted him with their money.

(1) all the above (2) a and d both (3) b and c both (4) a and b both

**69.** Which of the following sentences indicate the subjunctive mood ?

a. Is he really making things difficult.
b. Come what may, we will go ahead.
c. It is necessary for every member to inform himself of these rules.
d. Run to the shop.

(1) a and b both (2) b and c both
(3) c and d both (4) a and d both

**70.** What kind of pronoun "Each" is in the following sentence ?
"Each should love his own country."

a. Reciprocal pronoun
b. Relative pronoun
c. Distributive pronoun
d. Indefinite pronoun

(1) c and d both (2) c only (3) a and b both (4) d only

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

71. The correct passive voice of the sentence "People have seen wolves in the streets." is ________________.
(1) Wolves were seen in the streets by people.
(2) Wolves has been seen in the streets by people.
(3) Wolves have been seen in the streets by people.
(4) Wolves were being seen in the streets by people.

---

72. Identify the compound sentence from the following sentences.
(1) The child is sleeping.
(2) He was tired, so he went to bed early.
(3) Although it was cold, she went for walk.
(4) The poetry collection was interesting.

---

73. In the sentence "The ubiquitous nature of social media has permeated even the most remote corners of the globe". What does "ubiquitous" mean ?
(1) Present in only specific regions (2) Found sporadically
(3) Being present everywhere (4) Gradually diminishing

---

74. Which of the following words is an example of polysemy ?
a. A big and small
b. Bank (financial institution and river bank)
c. Dog and cat
d. Happy and sad
(1) b only (2) c and d both
(3) a, c and d (4) d only

---

75. Which is the noun forming suffix for the word, 'disinfect' ?
a. – ee
b. – ness
c. – ment
d. – ant
(1) Only b (2) Only d (3) Only c (4) Only a

---

76. The patient <u>has turned the corner</u>. Identify the correct meaning of the underlined idiom.
(1) Changed for the worse (2) Changed the position
(3) Passed a critical point (4) Turned to destruction

---

77. Choose the correct alternative where words are spelt correctly.
(1) Commitment, entrepreneur, guarantee, supervisor
(2) Committment, entreprenuer, guarantee, supervisor
(3) Committment, entreprenuer, guarrantee, supervisor
(4) Commitment, entrepreneur, guarantee, supervisar

---

78. Identify the linguistic concept for the following examples.
e.g. lead = metal
lead = dog's lead
a. Homonyms
b. Synonyms
c. Polysemy
d. Homographs
(1) Only a (2) Only d (3) Only c (4) Only b

---

79. Choose the correct meaning of the phrase, 'to thrive' in the given example.
e.g. The plants growing in deserts can thrive without water.
a. Perish
b. Survive
c. Succumb
d. Die
(1) Only c (2) Only b (3) Only d (4) Only a

---

80. Choose the wrongly spelled word.
(1) Vicious (2) Conscience (3) Panicy (4) Amount

---

81. Identify from the following the sentence, with the correct use of preposition.
a. He insisted to leave immediately.
b. He insisted for leaving immediately.
c. He insisted on leaving immediately.
d. He insisted upon leaving immediately.
(1) d only (2) a only (3) c only (4) b only

---

82. Identify the correct sentence in the 'Past Perfect Continuous Tense' from the options given below.
(1) I worked at the office until I got promoted.
(2) I was working at the office five years back.
(3) I worked at the office five years back.
(4) I had been working at the office for five years when I got the promotion.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**83.** Identify the meaning of preposition underlined in the sentence.
'We camped there <u>for</u> the summer.'
a. sometime
b. all through
c. ever
d. across
(1) Only b (2) Only c and d
(3) Only a and b (4) Only d

---

**84.** Identify the type of mood expressed in the sentence.
'The inspector inspected the school.'
a. Subjunctive
b. Imperative
c. Indicative
d. Conjunctive
(1) Only d (2) Only c (3) Only a (4) Only b

---

**85.** Choose the correct punctuated sentence from the following sentences.
a. "Play well", the captain said to the players, "and shoot a goal."
b. 'Play well' ; the captain said, to the players, and shoot a goal.
c. Play well ? the captain said "to the players", and shoot a goal.
d. Play well ! the captain said to the players. And shoot a goal.
(1) Only a (2) Only c (3) Only d (4) Only b

---

**86.** Choose the synonym of the underlined word.
"At the time of my retirement I do not have <u>malice</u> towards my colleagues".
(1) Affection (2) Animosity (3) Love (4) Devotion

---

**87.** The idiom – 'Red tape' correctly means
a. dark coloured tape
b. the same reply given by officers to many enquiring persons
c. over-use of rules, formalities etc. in administration
d. old-fashioned tape-recorder
(1) b only (2) d only (3) c only (4) a only

---

**88.** The word which replaces the phrase – 'One who hates women' correctly is

a. Misogamist
b. Misogynist
c. Misanthrope
d. Monogynist

(1) d only (2) a only (3) b only (4) c only

**89.** Identify the sentence in which the idiom 'a white elephant' is correctly used.

a. He bought a white elephant.
b. The Government's plan to build a new dam has been criticised as a white elephant.
c. A journey by air is a white elephant for the ordinary.
d. A white elephant is one of the rarest species today.

(1) Both a and b (2) Both b and c (3) Both a and c (4) Both a and d

**90.** Identify the correct meaning of underlined phrase in the given sentence.

Even after three meetings the negotiations are <u>at a standstill</u>.

a. finalized
b. unable to go on
c. upto the mark
d. to the point

(1) a and c (2) only d (3) only b (4) only a

**Read the following passage carefully and answer the questions from 91 to 95 :**

The world has come around to the view that democracy is essential for full human development. And only education and skill development can make this possible. Democracy cannot be sustained unless the electorate is well informed, chooses its leadership wisely and this leadership is intellectually empowered by a multi-dimensional intelligence. The world view of economic development has completely changed : it is no longer believed to be driven by human labour, as Karl Marx said or by capital, as Alfred Marshall stated, but is knowledge-driven. For application of knowledge, innovations are required and for more original research, we need many more young minds at the frontier. Knowledge is gender-neutral and hence the $21^{st}$ century offers a great opportunity to level the gender inequality of the last thousand years in India.

The youth require a mental faculty endowed with multi-dimensional intelligence. It is not adequate to foster cognitive intelligence alone – as is being done in India's educational campuses today – but to also develop the other dimensions of intelligence : emotional, social, moral, spiritual, environmental and innovational. India's vast youth population

is its demographic potential dividend but only if equipped and enabled with this seven-dimensional intelligence. The nation must, therefore, structure a national education policy for the youth so that the seven dimensions of intelligence can be manifested in every young man and woman. Only then will the demographic dividend not be wasted. These seven dimensions constitute the ability of a person to live a productive life and for the national good. Hence, a policy for India's youth has to be structured within the implied parameters of these dimensions.

The first parameter of such a policy is ability empowerment – the development of the seven types of intelligence. The second is a collective mindset about the legacy and future of the nation. This means knowing the correct de-falsified history of India. The third is the commitment to a social contract of rights and obligations such as a fundamental right to quality primary and secondary education, right to work, an obligation to compete for most positions of employment on merit, practice gender equality and place national interests above selfish interests.

A national education policy is, therefore, a framework for the comprehensive growth of the nation's young population, to enable them to be positioned in life for personal advancement as well contribute to national greatness. India, however, lacks today a properly structured policy for the development of its youth. As a result, many young people are led astray by drugs and crime.

**91.** In the light of the argument in the passage, the correct statement/s is/are ________________.

a. The status of India's youth population as the country's demographic dividend is conditional.
b. The educational campuses in India today focus on developing the cognitive intelligence of the students.
c. The economic development of a nation today has to be knowledge-driven.
d. Karl Marx's and Alfred Marshall's view of economic development of a nation is invalid in the current global scenario.

(1) Only a and d
(2) Only b
(3) Only c and d
(4) All a, b, c and d

---

**92.** The multi-dimensional intelligence of a person, for instance a student, is very essential because ____________________.

a. It leads him to productive life as well as national good.
b. It commits him to a social contract of rights and obligations.
c. It is a part of the nation's educational policy.
d. It helps to define the parameters of national educational policy.

(1) Only c
(2) Only d
(3) Only a
(4) Only b

**93.** Many young people in India succumb to drugs and criminal activities because ______________.

a. They spend most of their time outside their educational campuses.
b. The nation lacks a properly defined educational policy for their fostering.
c. They neglect Karl Marx's and Alfred Marshall's theory of the nation's economic development.
d. They care only about their personal advancement.

(1) Only c (2) Only d (3) Only b (4) Only a

---

**94.** The development of multi-dimensional intelligence of youth population implies ________________.

a. Creating awareness among the youth about gender-equality.
b. Fostering the innovative mindset of the youth population.
c. Fostering the cognitive, emotional, social, moral, spiritual, environmental and innovative intelligence of the youth population.
d. Creating awareness among the youth about their individual rights as well as national obligations.

(1) Only d (2) Only b (3) Only a (4) Only c

---

**95.** The major portion of the passage has been devoted to the discussion about ________________.

a. The youth population's involvement in drug-addiction and criminal activities.
b. The out-datedness of Karl Marx's and Alfred Marshall's view of economic development.
c. Structuring a proper national educational policy for the youth population.
d. The survival of democracy in India.

(1) Only d (2) Only a (3) Only c (4) Only b

---

**96.** Identify the complex sentence/s from the following :

a. The night is dark and I am far from home.
b. As long as I am in the company of Mahi, I feel very happy but I become sad when she is away from me.
c. A bird in the hand is worth two in the bush.
d. I believed that she had married the person whom she had loved.

(1) Both a and c (2) Only b (3) Only d (4) Both c and d

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**97.** 'The boy <u>who stole the watch</u> was caught.'
The clause underlined in the sentence above is a/an __________ clause.
a. Relative
b. Adjective
c. Adverbial
d. Noun
(1) Only b (2) Only d (3) Only a (4) Only c

---

**98.** Read the following sentence with jumbled words :
'are read/all over/Shakespeare/the world/the plays of'.
Which of the following is a meaningful sentence framed by putting the above jumbled words in a logical order ?
a. The plays of the world Shakespeare are read all over.
b. All over the plays of Shakespeare are read the world.
c. The plays of Shakespeare are read all over the world.
d. The plays of Shakespeare all over the world are read.
(1) Only d (2) Only a (3) Only b (4) Only c

---

**99.** 'You may do it <u>when you please</u>.'
The complex sentence above is converted into simple sentence by replacing the underlined clause by a phrase in the sentence above as follows :
a. You may do it at your pleasure.
b. You may do it as per your pleasure.
c. You may do it as you please.
d. You may do it with your pleasure.
(1) Only c (2) Only a (3) Only d (4) Only b

---

**100.** 'Men would look odd if they had three legs.'
The sentence above expresses _________ condition.
a. Unfulfilled past
b. Impossible
c. Hypothetical
d. Open
(1) Only d (2) Only c (3) Only b (4) Only a

---

**सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

SEAL

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्रीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**